**आदिवासी विकास विभागाच्या शासकीय आश्रमशाळेतील “माध्यमिक मुख्याध्यापक” संवर्गाच्या मंजूर ४५४ पदांमधून “कनिष्ठ महाविद्यालयीन मुख्याध्यापक” गट-ब (राजपत्रित) संवर्गासाठी १४८ पदे निर्माण करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्र:- MTD-३६०२४/४७/२०२४-MTD(Desk१५)**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दि. १३ मार्च, २०२६

**वाचा :-**

१. शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्र.पदआ ३८१७/प्र.क्र.१३९/का-१५, दि.१६.११.२०२२.
२. शासन अधिसूचना, आदिवासी विकास विभाग, क्र.आस्था-२०२२/प्र.क्र.६७/का.१५, दि.१५.०३.२०२४.
३. मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्र.२५६१/२०२० व ३०२०/२०२१ प्रकरणी मा.न्यायालयाचे दि.२७.०३.२०२४ रोजीचे आदेश.
४. मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल अवमान याचिका क्र. ५४४/२०२५ व ६३६/२०२५ प्रकरणी मा.न्यायालयाचे दि.१२.११.२०२५ रोजीचे आदेश.

**प्रस्तावना :-**

आदिवासी विकास विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयांचा सुधारीत आकृतीबंध दि.१६.११.२०२२ च्या शासन निर्णयान्वये मंजूर झाला आहे. सुधारीत आकृतीबंधानुसार “माध्यमिक मुख्याध्यापक” संवर्गात ४५४, “कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक” संवर्गात १११३ व “माध्यमिक मुख्याध्यापक” संवर्गात १९११ पदे मंजूर आहेत.

२. आदिवासी विकास विभागाच्या शासकीय आश्रमशाळेतील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना पदोन्नतीची पुढील संधी उपलब्ध नसल्याने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. सदर रिट याचिका क्र.२५६१/२०२० व ३०२०/२०२१ प्रकरणी मा.न्यायालयाने आदेश पारीत केले आहेत.

“We direct the State Government through Tribal Development Department to finalize Rules and regulations for the purpose of determining the seniority to the post of Principal on the junior Colleges as prayed for within six months from today.”

३. मा.न्यायालयाचे आदेश विचारात घेता, आदिवासी विकास विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयाच्या सुधारीत आकृतीबंधानुसार “माध्यमिक मुख्याध्यापक” या संवर्गात मंजूर ४५४ पदांमधून शासकीय आश्रमशाळांमधील कनिष्ठ महाविद्यालये संलग्नित आहेत, अशा शासकीय आश्रमशाळेतील

"माध्यमिक मुख्याध्यापक" पदांऐवजी "कनिष्ठ महाविद्यालय मुख्याध्यापक" गट-ब (राजपत्रित) संवर्गाची १४८ पदे एस १८: ४९१००-१५५८०० वेतनस्तरात निर्माण करण्यास उच्चस्तरीय सचिव समितीच्या दि.०९.०१.२०२६ रोजीच्या बैठकीत मान्यता दिली आहे.

४. उच्चस्तरीय सचिव समितीने दिलेल्या मान्यतेस अनुलक्षून "कनिष्ठ महाविद्यालय मुख्याध्यापक" गट-ब (राजपत्रित) संवर्गाची १४८ पदे एस १८: ४९१००-१५५८०० वेतनस्तरात निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचारधीन होती.

**शासन निर्णय :-**

आदिवासी विकास विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयाच्या सुधारीत आकृतीबंधानुसार "माध्यमिक मुख्याध्यापक" या संवर्गात मंजूर ४५४ पदांमधून शासकीय आश्रमशाळांमधील कनिष्ठ महाविद्यालये संलग्नित आहेत, अशा शासकीय आश्रमशाळेतील "माध्यमिक मुख्याध्यापक" पदांऐवजी "कनिष्ठ महाविद्यालय मुख्याध्यापक" गट-ब (राजपत्रित) संवर्गाची १४८ पदे एस १८: ४९१००-१५५८०० वेतनस्तरात निर्माण करण्यात येत आहेत. यामुळे "माध्यमिक मुख्याध्यापक" संवर्गाची ३०६ पदे राहतील.

२. शासकीय आश्रमशाळांमधील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांमधून ज्येष्ठता अधीन पात्रता या निकषानुसार "कनिष्ठ महाविद्यालयीन मुख्याध्यापक" गट-ब (राजपत्रित) या पदावर पदोन्नतीने नियुक्ती करण्यात येईल. ज्या शासकीय आश्रमशाळा कनिष्ठ महाविद्यालयाशी संलग्नित आहेत, अशा शासकीय आश्रमशाळेत कार्यरत असलेल्या माध्यमिक मुख्याध्यापकाचे पद सेवानिवृत्त/राजीनामा/मृत्यू/बदली व इतर कारणांमुळे रिक्त झाल्यानंतर, त्या पदावर कनिष्ठ महाविद्यालयीन मुख्याध्यापकाची नेमणूक करण्यात येईल.

३. सदरहू शासन निर्णय उच्चस्तरीय सचिव समितीने दि.०९.०१.२०२६ च्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार आणि वित्त विभागाच्या, अनौपचारिक संदर्भ क्र."अनौसं ७४/ आपुक दि.०६.०३.२०२६" अन्वये दिलेली सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२६०३१३१३४८३४१८२४ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

AJAY MAHADEV SAKHARE

Digitally signed by AJAY MAHADEV SAKHARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=8551bf5940f7a6d8f106f2dd0205e9978bbd325c77d8bf280667344780ebe3e8, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=72E7AB3D2A7454139BED9EE5298E46008FBE5FB1F2981B96BD7E2EC94BB26F21, cn=AJAY MAHADEV SAKHARE
Date: 2026.03.13 14:37:38 +05'30'

**(अजय साखरे)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.मंत्री (आ.वि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

२. मा.राज्यमंत्री (आ.वि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक.
८. सर्व अपर आयुक्त, आदिवासी विकास.
९. महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई-४०० ०२०.
१०.महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई-४०० ०२०.
११.महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर.
१२.महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर.
१३.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१४.संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी .
१५.सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
१६.निवडनस्ती, का-१५.